# मुंबई विद्यापीठ

सुधारीत आवृत्ती

## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र. वि.क.वि./१७/२०१६

डॉ मनाली लोंढे.
संचालक,

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक :

विषय : गरजू विद्यार्थ्यांना/आर्थिक दृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) देण्याबाबत.

---

महोदय /महोदया,

मुंबई विद्यापीठाशी सलंग्न महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विभाग यामधून शिकणा-या गरजू / आर्थिक दृष्टया दुर्बळ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) ही योजना शैक्षणिक वर्ष २००४-२००५ या वर्षापासून सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी) ची तरतूद विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली असून त्यावर मिळणा-या व्याजामधून विद्यार्थ्यांना मदत दिली जाणार आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी विद्यार्थ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी आपल्या महाविद्यालयातील/ संस्थेतील गरजू आणि आर्थिक दृष्टया दुर्बळ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) मिळण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावेत. सर्वात जास्त गरजू अशा **पाच (५)** विद्यार्थ्यांचे अर्ज खालील सर्व गोष्टींची पूर्तता करुन **शुक्रवार, दिनांक ३० सप्टेंबर २०१६** पर्यंत आपल्या शिफारीशीसह या कार्यालयास पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदर योजने अंतर्गत पदवी / पदविका / पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फी साठी आर्थिक सहाय्य दिले जाईल.

### अर्ज सादर करताना खालील गोष्टींची पूर्तता करणे अपेक्षित आहे :

१. प्रत्येक महाविद्यालय / संस्थेतील / विभागातील फक्त **पाच (५)** विद्यार्थ्यांचेच अर्ज स्विकारले जातील.
२. अर्ज विद्यार्थ्यांनी स्वत: भरुन दयावा.
३. प्राधिकृत आधिका-यांने दिलेल्या जातीच्या प्रमाणित पत्राची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.
४. मागील वर्षाचे कुटुंबाच्या उत्पन्नाचा प्राधिकृत आधिका-याने दिलेला दाखला जोडणे आवश्यक आहे. कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त नसावे. (पालकांचे उत्पन्न कायम स्वरुपी नसल्यास त्या बाबत प्राचार्यानी दाखला दयावा)
५. सन् **२०१६-२०१७** मध्ये शैक्षणिक फी भरल्याच्या पावतीची प्रमाणित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
६. विद्यार्थ्यास यापूर्वी दुस-या कोणत्याही शासकीय अथवा इतर योजनेखाली आर्थिक सहाय्य मिळाले असल्यास त्यासंबंधी माहिती द्यावी.
७. दिलेल्या वेळेत अर्ज सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची व प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुखांची राहील.
८. विद्यार्थ्यांच्या मागील शैक्षणिक वर्ष **२०१५-१६** च्या परिक्षेची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.
९. आधार कार्डची छायांकित प्रत सोबत जोडावी.
१०. राष्ट्रीयकृत बॅकेतील वैयक्तिक खाते क्र. व बॅकेचे नाव .: ------------------------------

### प्राचार्य / संचालक / विभागप्रमुखांसाठी सूचना :

अ. विद्यार्थ्यासाठी सदर व योजनेची माहिती ठळकपणे सूचना फलकात प्रसिध्द करावी. गरजू व पात्र विद्यार्थ्यांना अर्ज उपलब्ध करुन द्यावे व त्याची छाननी करुन फक्त **पाच (५)** अर्ज पाठवावे.
ब. अर्ज सादर करताना वरील सर्व गोष्टींची पूर्तता झाली आहे का याची खात्री करावी.
क. अपूर्ण अर्जाचा आणि दिनांक **३० सप्टेंबर २०१६** नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
इ. १ सप्टेंबर, २०१६ या शैक्षणिक वर्षात वयोमर्यादा २५ व त्या आतील असलेल्या विद्यार्थ्यांना हया योजनेचा लाभ घेता येईल.

Manali L

(डॉ. मनाली लोंढे.)
संचालक

मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २४ जुन,२०१६.